महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in


**क्र. ३७४(२)/स्थापत्य /२०२०/१९** **दिनांक:- २७ एप्रिल, २०२२**

**प्रसिध्दीपत्रक**

**विषय :- महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा- २०२० च्या मुलाखतीबाबत**

**संदर्भ :- १) पूर्व परीक्षा जाहिरात क्र. ०६/२०२० व मुख्य परीक्षा जाहिरात क्र. ६१/२०२१**
**२) आयोगाचे एमआयएस-०६१५/सीआर-१३/२०२१/तीन, दिनांक १४ जुलै, २०२१ रोजीचे समक्रमांकाचे प्रसिध्दीपत्रक**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा-२०२० च्या लेखी परीक्षेचा निकाल दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

२. प्रस्तुत परीक्षेच्या निकालाआधारे मुलाखतीस अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक ९ ते १३ मे,२०२२, दिनांक २३ मे ते २७ मे, २०२२ तसेच दिनांक ३० ते ३१ मे, २०२२ या कालावधीत **पुणे जिल्हा परिषद, नवीन प्रशासकीय इमारत, पाचवा मजला, १ वेलस्ली रोड, यशवंतराव चव्हाण भवन, कॅम्प, पुणे - ४११ ००१ येथे आयोजित करण्यात आल्या आहेत.**

३. मुलाखतीस पात्र उमेदवारांना मुलाखतपत्र त्यांच्या प्रोफाईल मध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहे.

४. मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

५. संबंधित उमेदवारांना लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येत आहे.

६. मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांनी मुलाखतीच्या दिवशी प्रमाणपत्रे / कागदपत्रे तपासणीच्यावेळी अर्जात केलेल्या दाव्यापृष्ठर्थ आवश्यक ती सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. ती सादर न केल्यास मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर करण्याकरिता कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही.

७. करोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने केंद्र व राज्य शासन आणि स्थानिक प्राधिकरणाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या सर्व सूचना व आदेश यांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

ठिकाण :- मुंबई

उपसचिव
(राजपत्रित परीक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.